


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६९ वा | सोमवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मुंबईत ज्ञानेश कुमार, पुण्यात भीमनवारांविरोधात एल्गार !

# ठाकरे बंधूंच्या ‘गर्जना मोर्चा’त निवडणूक आयोगावर हल्लाबोल

## पुण्यात MPSC विद्यार्थ्यांचा आक्रोश; आ. रोहित पवार सत्याग्रह आंदोलन

**मुंबई/ पुणे (कटूसत्य वृत्त):-** एकीकडे मुंबईत ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली निघालेल्या ‘गर्जना मोर्चा’तून निवडणूक आयोगाच्या कारभारावर आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवर जोरदार हल्लाबोल करण्यात आला, तर दुसरीकडे पुण्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) कारभाराविरोधात सत्याग्रही आंदोलन करत आ.रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचा संताप रस्त्यावर उतरला आहे. त्यामुळे राज्याच्या राजकीय आणि विद्यार्थी आंदोलनाच्या पटलावर सध्या ‘ज्ञानेश कुमार यांना घरी बसवा’ आणि ‘MPSC अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याचा निर्णय घ्या’ या दोन मागण्या ठळकपणे पुढे आल्या आहेत.

मुंबईत ४ ऑक्टोबर रोजी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ‘गर्जना मोर्चा’ काढण्यात आला. मेट्रो सिनेमा परिसरातून सुरू झालेला हा मोर्चा मुंबई महापालिका मुख्यालयाजवळील सभेपर्यंत पोहोचला. या वेळी दोन्ही नेत्यांनी निवडणूक प्रक्रिया, SIR आणि निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले. राज ठाकरे यांनी रक्क्रप्रक्रिया रद्द करण्याची आणि EVM ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी मांडली.

उद्धव ठाकरे यांनीही निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेवर तसेच निवडणूक व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर सवाल











उपस्थित केले. त्यांच्या भाषणातून केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर तीव्र राजकीय टीका करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर आता पुण्यातील टढरउ विद्यार्थ्यांचे आंदोलनही निर्णायक वळणावर पोहोचले आहे. MPSC परीक्षांतील कथित गैरप्रकार, पेपरफुटीचे आरोप, परीक्षा पद्धती आणि आयोगाच्या कारभाराबाबत विद्यार्थ्यांमध्ये असंतोष आहे. विद्यार्थ्यांनी टढरउ अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली असून आमदार रोहित पवार यांनी या मागणीला पाठिंबा देत आंदोलनात सहभाग घेतला आहे.

### ‘अध्यक्षांचा राजीनामा घ्या’ – विद्यार्थ्यांचा ठाम सूर

पुण्यात विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनात MPSC अध्यक्षांच्या राजीनाम्याचा मुद्दा केंद्रस्थानी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विद्यार्थ्यांची चर्चा झाली आणि काही मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आल्याचे सरकारकडून सांगण्यात आले. मात्र, अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीवर ठोस निर्णय न झाल्याने विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरूच ठेवले आहे.

आमदार रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा देत अध्यक्षांच्या राजीनाम्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने मंजूर करून तो राज्यपालांमार्फत राष्ट्रपतींकडे पाठवावा, अशी मागणी केली आहे. MPSC अध्यक्ष हे घटनात्मक पद असल्याने त्यांना राज्य सरकार थेट हटवू शकत नसल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे.

MPSC परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या प्रकरणामुळे विद्यार्थ्यांचा रोष वाढला. सप्टेंबरमध्ये पुण्यात विद्यार्थ्यांनी मोठा आक्रोश मोर्चा काढत आयोगाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले होते. पेपरफुटी झाल्याने आंदोलन पेटले असून अध्यक्ष विवेक भीमनवार आणि सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली होती.

दरम्यान, अध्यक्ष भीमनवार यांनी आपली बाजू मांडताना पेपरफुटीचा ठोस पुरावा दिल्यास आपण पदावर राहणार नाही, अशी भूमिका मांडली होती. त्यामुळे आता आरोप–प्रत्यारोपांपेक्षा आयोगाच्या परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचा विश्वास हा मुख्य प्रश्न बनला आहे.

संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला काळे फासले होते याची दखल घेत सरकारने दरम्यानच्या काळात MPSC सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली केली आहे. मात्र अध्यक्षांच्या राजीनाम्यावर विद्यार्थी ठाम आहेत.

### दोन आंदोलनांचा केंद्रबिंदू – ‘विश्वासाचा प्रश्न’

मुंबईतील गर्जना मोर्चा असो किंवा पुण्यातील MPSC विद्यार्थ्यांचे आंदोलन, दोन्ही ठिकाणी मूलभूत मुद्दा व्यवस्थेवरील विश्वासाचा असल्याचे चित्र दिसत आहे.

मुंबईत निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत; तर पुण्यात विद्यार्थी आपल्या परीक्षा, भरती प्रक्रिया आणि भविष्यासंदर्भात आयोगाकडून पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची मागणी करत आहेत.

एका बाजूला राजकीय पक्ष निवडणूक व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करत रस्त्यावर उतरले आहेत, तर दुसऱ्या बाजूला हजारो स्पर्धा परीक्षार्थी आपल्या करिअरशी संबंधित प्रश्नांसाठी आंदोलन करत आहेत. त्यामुळे आगामी काळात सरकार आणि संबंधित घटनात्मक संस्थांसमोर विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा मिळवणे आणि पारदर्शकतेबाबत ठोस पावले उचलणे, हे मोठे आव्हान ठरणार आहे.

पुण्यातील विद्यार्थ्यांनी अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी कायम ठेवली असून, रोहित पवार यांनीही या मागणीवरून आंदोलनाची भूमिका आक्रमकपणे मांडली आहे. त्यामुळे ‘MPSC अध्यक्षांना घरी पाठविल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही’, असा निर्धार आंदोलनातून व्यक्त होत असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे मुंबईतील गर्जना मोचार्तून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी पुढे आली आहे.

राज्याच्या दोन वेगवेगळ्या आंदोलनांतून एकच प्रश्न मात्र ठळकपणे समोर येत आहे. लोकशाही असो किंवा स्पर्धा परीक्षा, अंतिम कसोटी ही पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जनतेचा विश्वास यांचीच असणार आहे.

### ‘विश्वास’ कुठे हरवला ?

निवडणूक आयोग असो किंवा लोकसेवा आयोग—दोन्ही संस्था जनतेच्या आणि विद्यार्थ्यांच्या विश्वासावर उभ्या आहेत. एका बाजूला मतदारांच्या विश्वासाचा प्रश्न उपस्थित होत आहे, तर दुसऱ्या बाजूला स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

मतदाराला आपल्या मताची चिंता आणि विद्यार्थ्याला आपल्या मेहनतीची चिंता; दोघांच्याही प्रश्नाच्या केंद्रस्थानी मात्र एकच शब्द—विश्वास !

निवडणूक व्यवस्थेबाबत निर्माण झालेले प्रश्न असोत किंवा MPSCच्या परीक्षा प्रक्रियेवरील आरोप; त्यांची उत्तरे घोषणांमधून नव्हे, तर पारदर्शक चौकशी, स्पष्ट निर्णय आणि जबाबदारी निश्चित करण्याच्या प्रक्रियेतून मिळणे अपेक्षित आहे.

मुंबईतून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याचा राजकीय आवाज घुमला असताना पुण्यातून टढरउ अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. त्यामुळे आगामी काळात सरकार या दोन्ही आघाड्यांवरील वाढता असंतोष कसा हाताळते आणि संबंधित संस्थांवरील जनतेचा विश्वास कसा टिकवते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

मुंबईची ‘गर्जना’ आणि पुण्याचा ‘एल्गार’—दोन्हीकडून व्यवस्थेला एकच सवाल : जबाबदारी कोणाची ?

# जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींची वसुंधरा पायी दिंडी सोलापूरात

## ५ व ८ ऑक्टोबरला शहरातून दिंडी; भाविकांनी दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी (दक्षिणपीठ नाणिजधाम) यांच्या वसुंधरा पायी दिंडीचे सोलापूर शहरात आगमन होत असून, ५ ऑक्टोबर व ८ ऑक्टोबर रोजी या दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्रींचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन रामानंद संप्रदाय उत्तर सोलापूर सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचे २९ ऑक्टोबर २०२६ रोजी जन्मोत्सव सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर उपपीठ नाणिज येथून वसुंधरा पायी दिंडी



काढण्यात येत आहे. ५ ऑक्टोबर रोजी ही दिंडी सोलापूर येथे दाखल होणार असून, त्यादिवशी संध्याकाळी लक्ष्मीनारायण गार्डन, शिवाजी नगर, वाळे चौक येथे श्रींच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी श्रींचे पादुका दर्शन घेऊन भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

त्यानंतर ७ ऑक्टोबर रोजी वसुंधरा पायी दिंडी वारुधार येथे मुक्कामी राहणार असून, ८ ऑक्टोबर रोजी सोलापूर शहरात तिचे आगमन होणार आहे. या दिवशीही संध्याकाळी लक्ष्मीनारायण गार्डन, शिवाजी नगर, वाळे चौक येथे दिंडीचा मुक्काम राहणार आहे. भाविकांनी श्रींच्या पादुकांचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे समितीने म्हटले आहे.

जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने देशातील विविध राज्यांतून आणि त्यांच्या उपपीठातून वसुंधरा पायी दिंडीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. ‘जागोजागी वृक्षरोपण, मुक्कामी वृक्षारोपण’ करत ही दिंडी निघाली आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच आध्यात्मिक व सामाजिक जनजागृतीचा संदेश या दिंडीच्या माध्यमातून दिला जात आहे.

‘आपण या जनहितार्थ सेवाभावी कार्यामध्ये सर्वजण सहभागी होऊन किमान ५ किलोमीटर अंतर चालून आपला सहभाग नोंदवावा’, असे आवाहनही रामानंद संप्रदाय उत्तर सोलापूर सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

- दिगंबर आवताडे : ९९२१६५१०५०
- विनायक कांबळे : ७०५८०७०९१६
- नरसिंह सांगोळे, प्रसिद्धी प्रमुख : ९६७३५५४६०६

# अकलूज येथे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर...

## रुग्ण सेवेच्या नावाखाली चिरफाड तर रक्तरंजित उपचार.. ?

**अकलूज (विलास गायकवाड):-** अकलूज-संग्रामनगर परिसरातील, आलिशान आणि प्रशस्त असणाऱ्या काही हॉस्पिटलमध्ये, रुग्णसेवेच्या नावाखाली चिरफाड आणि रक्तरंजित उपचार होत आहेत का ? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. यामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, संबंधित हॉस्पिटलची सखोल चौकशी करावी अशी मागणी लेखी तक्रारीद्वारे आरोग्य विभागाकडे करण्यात आली आहे. परंतु आरोग्य विभागाकडून मिळणारा संमिश्र प्रतिसाद आणि कासव गतीने चाललेली चौकशी संशयास्पद वाटत असून,जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा समन्वयक अधिकारी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, यांनी अत्यंत गंभीर असणाऱ्या विषयाकडे लक्ष केंद्रित करावे अशी मागणी होत आहे.

आपुलकी आणि विश्वासाचं दुसरं नातं म्हणजे डॉक्टर असतात. सर्वसामान्य जनता दैव अवतार म्हणून डॉक्टरकडे पहात असते.सर्वच डॉक्टर माणुसकी सोडून वागतात असे म्हणणे चुकीचे आहे. काही डॉक्टर माणुसकीच्या पलीकडे जाऊन रुग्ण सेवा करतात.तिथे बिलाचा विचार करत नाहीत.

फक्त रुग्णांचा विचार करतात. कोरोना महामारीच्या वेळी अनेक डॉक्टरांनी, स्वतःच्या जीवाची बाजी लावून, कित्येक रुग्णांचे प्राण वाचवले आहेत. प्रामाणिकपणे रुग्णांची सेवा करत असताना, कित्येक डॉक्टर स्वतःही कोरोनाच्या विळख्यात सापडले होते आणि हे सत्य आहे; ते नाकारता येणार नाही !



लोक म्हणतात,अकलूज शहर हे वैद्यकीय दुनियेतील माहेर घर आहे. लोकवस्ती कमी पण हॉस्पिटलची संख्या आवाक्या बाहेर आहे. विविध प्रकारचे तज्ञ रुग्णांसाठी इथे तत्पर आहेत. स्वतःचे हॉस्पिटल असताना, व्यवसायाच्या दृष्टिकोनातून चार–पाच जण तज्ञ डॉक्टर, एकत्रित येऊन,भले मोठे आवाढव्य असे हॉस्पिटलची निर्मिती करतात. सदर हॉस्पिटल मध्ये शासकीय योजना राबवतात आणि येथूनच सुरुवात होते एका नव्या पर्वला.. ? शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी, गरज नसताना, रुग्णांवर शस्त्रक्रिया केली जाते असे कथित आरोप होत आहेत. जिथे खरोखरच गरज आहे, तिथे शस्त्रक्रिया झालीच पाहिजे. परंतु गरज नसताना, चिरफाड आणि रक्तरंजित उपचार करणे म्हणजे, रुग्णांच्या जीवाशी खेळणे म्हणावे लागेल ?हे केवळ शासकीय योजनांचा अर्थलाभ घेण्यासाठी म्हणावे का ? संबंधित एका हॉस्पिटलने मागील पाच सहा वर्षात 23 कोटी 27 लाख 87 हजार 882 रुपये एवढ्या रक्कमेचा लाभ घेतला असल्याचे समोर आले आहे. याचा अर्थ काय समजावा, बोगस रुग्ण ?बोगस बिले ? का बोगस शस्त्रक्रिया ? सखोल चौकशीअंती छडा लागेल;तर सदर हॉस्पिटल डॉक्टरांच्या नावासह प्रकाश झोतात येतील यात शंका नाही.






# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे १०० टक्के क्षेत्राचे सरसकट पंचनामे करावेत - पालकमंत्री गोरे



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाने सोलापूर जिल्ह्यातील अकराही तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे जिल्ह्यातील विविध दुष्काळग्रस्त भागांना भेटी देत आहेत. आज त्यांनी सांगोला तालुक्यातील कटफळ येथे भेट देऊन दुष्काळामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शंभर टक्के क्षेत्राचे पंचनामे करा

दुष्काळामुळे ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले (पान 2 वर..)

# सोलापूर स्ट्रीट बझारमधील मावा खाऊन थुंकणाऱ्यांवर पोलिसांचा 'ॲक्शन मोड'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** होम मैदानालगतच्या स्ट्रीट बझार परिसरात मावा खाऊन थुंकणे, अस्वच्छता करणे आणि टवाळखोरी करणाऱ्या युवकांवर पोलिसांनी शनिवारी मध्यरात्री कारवाई केली. या कारवाईत सुमारे 70 ते 80 युवकांना ताब्यात घेण्यात आले.

आमदार देवेंद्र कोठे यांनी शुक्रवारी मध्यरात्री शहरातील स्वच्छतेची पाहणी करताना स्ट्रीट बझार परिसराचीही पाहणी केली होती. यावेळी ठिकठिकाणी मावा खाऊन थुंकल्याचे तसेच परिसर अस्वच्छ केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कारवाई करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली होती.

स्ट्रीट बझार हा नागरिक, महिला आणि लहान मुलांना स्वच्छ व सुरक्षित वातावरणात खाद्यपदार्थांचा आनंद घेता यावा, या उद्देशाने विकसित करण्यात आला आहे. मात्र, काही युवकांकडून येथे मावा खाऊन थुंकणे, कचरा करणे आणि परिसर विद्रूप करण्याचे प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी होत्या.

आमदारांच्या पाहणीनंतर 24 तासांच्या आत

## 70 ते 80 युवक ताब्यात



पोलिसांनी कारवाई करत शनिवारी रात्री या युवकांना ताब्यात घेतले. सार्वजनिक ठिकाणी विनाकारण फिरणे, अस्वच्छता करणे आणि परिसराचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आल्याने या प्रकारांना आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे सोलापूरचे जिल्हाधिकारी असताना ज्या रस्त्यामुळे मोठी चर्चा झाली होती, त्याच परिसरात आता मावा खाऊन थुंकणाऱ्यांवर कारवाईची सुरुवात झाल्याची चर्चा सोलापुरात रंगली आहे.



## संपादकीय

# दुष्काळाशी दोन हात

राज्य सरकारने २५ सप्टेंबर रोजी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला होता; परंतु घोषित न झालेले अन्य तालुकेही दुष्काळाच्या झळा सोसत आहेत, हे निदर्शनास आले. त्यानुसार आणखी ४३ तालुक्यांचा दुष्काळाच्या परिघात समावेश केला आहे.

त्यामुळे आता दुष्काळी तालुक्यांचा एकूण आकडा ३०८ या विक्रमी पातळीवर गेला आहे. मराठवाड्यात परिस्थिती अत्यंत चिंताजनक आणि विदारक आहे. यंदा खरिपाच्या उत्पादनात विक्रमी घट होण्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तवला आहे. शेतकऱ्यांच्या प्रपंचाचे आणि पशुधनाचे संकटही मोठे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळ जाहीर करताना १२ प्रमुख उपाययोजनांचा तपशील दिला होता. त्याचा विस्तार करण्यात येत आहे. दुष्काळात सर्वात मोठा प्रश्न असतो जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याच्या उपलब्धतेचा. मंत्रिमंडळ बैठकीत वैरण विकास धोरणाला मंजुरी देऊन सरकारने दुग्ध व्यवसाय आणि पशुपालनाला उद्योगाचे स्वरूप देण्याचा निर्णय घेतला. या धोरणांतर्गत दुष्काळातही जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपाययोजना, वैरणीच्या प्रजातींची लागवड आणि पारंपरिक-अपारंपरिक चारा स्रोतांचा वापर करण्याचे ठरवले आहे. अंमलबजावणी कशी होते, यावर दुष्काळग्रस्त भागातील पशुधनाचे अस्तित्व अवलंबून असेल. दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांकडून बँक किंवा पतसंस्थेने पीक कर्ज वसुलीसाठी तगादा लावू नये, असे आदेश दिलेत.

बँकांच्या कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या घराकडे फिरकूही नये, यासाठी जिल्हाधिकारी व पोलिस प्रशासनाला सूचना दिल्या. रिझर्व्ह बँकेने कर्ज वसुली स्थगितीबाबत तातडीने परिपत्रक काढावे, यासाठी मुख्य सचिवांना पाठपुरावा करण्यास सांगितले. शेतकरी किंवा तरुणांच्या आत्महत्यांमागील कारणांचा शोध घेतला असता कर्ज वसुलीसाठीचा तगादा हे प्रमुख कारण दिसून येते. कर्जाची परतफेड हा वित्तीय शिस्तीतील महत्त्वाचा घटक आहे; पण कर्जदारासाठी तो सामाजिक प्रतिष्ठेचा आणि कुटुंबाच्या काळजीचा मुद्दा असतो. विजय मल्ल्यासारख्यांचे हजारो कोटींचे कर्ज बुडत असताना बँका त्याला नियम-कायद्यांचा चाप लावत नाहीत; पण शेतकऱ्याचे पाच-दहा हजार रुपये थकल्यास मानहानिजनक बोल सुनावतात. अन्नदात्याच्या मागे कर्ज वसुलीचा जाचक ससेमिरा लावल्यास तो मरणाला कवटाळण्याची भीती असते. त्यामुळे थेट सरकारनेच याबाबत पाऊल टाकले ते बरे झाले. खरीप पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करताना थेट शेतकऱ्याची स्वाक्षरी अनिवार्य करण्याचा निर्णयदेखील महत्त्वपूर्ण आहे. दुष्काळ, अतिवृष्टी किंवा अवकाळी पावसामुळे पिकांची हानी होते, तेव्हा सरकार मदत मोठा दिलासा ठरते. गाव पातळीवर प्रत्यक्ष शेतावर न जाता किंवा घाईगडबडीत कागदोपत्री पंचनामे केल्याच्या तक्रारी शेतकरी करायचे.

नैसर्गिक आपत्तीनंतर पंचनाम्यांवर केवळ सरपंच किंवा पोलिसपाटील यांची सही पुरेशी मानली जात होती. या प्रक्रियेत शेतकऱ्याला आपले किती नुकसान नोंदवले, याची माहितीच नसायची. नुकसान जास्त असतानाही कागदावर कमी टक्केवारी दाखवणे, चुकीचा गट क्रमांक नोंदवणे किंवा प्रत्यक्ष बाधित नसलेल्या क्षेत्राची नोंद होणे अशा चुकांमुळे गरजू आणि खरा बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहायचा. नवीन नियमांमुळे स्वतःच्या नुकसानीची नोंद काय झाली, हे त्वरित समजेल. नोंदवलेली टक्केवारी किंवा क्षेत्र चुकीचे वाटले, तर त्याच वेळी हरकत नोंदवता येईल. सर्व माहिती आणि बँक खात्याचा तपशील पंचनाम्यावेळीच गोळा केल्याने थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेला गती मिळेल. यापूर्वी त्रुटी राहिल्यास जबाबदारी ढकलण्याची भूमिका नोकरशाही घेत असे. आता पंचनामा शेतकऱ्याच्या संमतीने तयार झाल्याने तो अधिक वस्तुनिष्ठ आणि अचूक ठरेल. भविष्यात आपत्ती व्यवस्थापन अधिक कार्यक्षम आणि प्रत्यक्ष बाधितकेंद्री बनवण्यासाठी ही सुधारणा मैलाचा दगड ठरेल. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दुष्काळग्रस्त भागातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला. तीच भूमिका खासगी शाळांनीही घ्यावी.

राज्यातील विविध देवस्थानांनीही या संकटाचा सामना करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. शेगाव संस्थानने एक कोटी रुपयांची मदत देऊन श्रीगणेशा केला आहे. सरकार सर्वतोपरी मदत करेल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे आणि त्यानुसार धोरणात्मक पावलेही टाकली; पण संकट मोठे असल्याने 'आहे रे' वर्गाची जबाबदारी अधिक आहे. शासकीय यंत्रणेने आणि नोकरशाहीनेही सरकारच्या भूमिकेशी सुसंगत कार्यपद्धती अनुसरावी. अनेक शेतकऱ्यांनी मागेल त्याला विहीर योजनेचा लाभ घेण्यासाठी कर्जे काढून विहिरी खणल्या; पण काही ठिकाणी अधिकारी मस्टर काढत नसल्याने मजुरांचे पैसे आणि शेतकऱ्यांचे अनुदान लालफितीत अडकले आहे. हे पैसे अदा केले, तर तो मोठा दिलासा ठरेल. रोजगार हमी योजना विभागाने शेतमजूर आणि शेतकऱ्यांच्या हाताला काम देण्यासाठी ६,७२८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या माध्यमातून जलसंधारण, सिंचन, शेत-पाणंद रस्ते, गोठे आणि वैयक्तिक फळबाग लागवड अशी ३७५ प्रकारची कामे हाती घेतली जाणार आहेत. रोहयोची कामे वेळेवर सुरू न झाल्यास ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर रोखणे अशक्य होऊन बसेल. त्यामुळे या संकटकाळात प्रशासनाची जबाबदारी अधिक आहे.

कोल्हापूर, सातारा आणि नाशिक जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेली बिकट स्थिती प्रशासनाला अवगत आहे; पण त्याचे वास्तव चित्र शासनाकडे मांडले गेलेले नाही. त्यामुळे हे तालुके अद्यापही सरकारी उपाययोजनांच्या परिघाबाहेर राहिले. नोकरशाहीने या भूमिकेतून बाहेर पडणे गरजेचे आहे. दुसरीकडे ११ लाख कोटींचे कर्ज आणि ४० हजार कोटींची महसुली तूट असल्याने राज्य सरकारला दुष्काळग्रस्तांना मदत करण्यास मर्यादा येणे अटळ आहे. अशा वेळी केंद्राने तत्काळ मदत जाहीर करणे गरजेचे आहे. मागील काळात २०१५-१६ मध्ये केंद्रीय पथकाने तीन वेळा पाहणी करून ४,३१८ कोटी, तर २०१८-१९ मध्ये ७,९६२ कोटी रुपयांची मदत दिली होती. या आठवड्याच्या अखेरीस केंद्राचे पथक महाराष्ट्रात दाखल होऊन खरीप पिकांच्या नुकसानीचा आढावा घेणार असल्याचे केंद्रीय कृषिमंत्र्यांनी म्हटले आहे. या पथकाच्या अहवालानंतर गृह आणि कृषी मंत्रालयाच्या बैठकीत अंतिम निधीवर मोहोर उमटवली जाईल. ही प्रक्रिया जास्त लांबता कामा नये. अन्यथा या शासकीय सोपस्कारांमध्ये शेतकरी रोजच्या जगण्याच्या लढाईत पराभूत होण्याची भीती आहे.


## CHANGE IN NAME

I am changing my name from **SIDRAM BANDEPPA HARIHAR** To **SIDDHARAM BANDEPPA HARIHAR** for passport issuance as per document.

## CHANGE IN NAME

I am changing my name from **KIRAN SIDRAM HARIHAR** To **KIRAN SIDDHARAM HARIHAR** for passport issuance as per document.


# समाजपरिवर्तनाच्या प्रवासातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्त्व : डॉ. बालाजी जाधव

विचारांची मशाल हातात घेऊन समाजाच्या अंधाऱ्या वाटांवर प्रकाश पेरणारी माणसे काळाच्या ओघात केवळ व्यक्ती राहत नाहीत; ती एका विचारप्रवाहाची, एका चळवळीची आणि एका पिढीच्या आशेची ओळख बनतात. डॉ. बालाजी जाधव हे असेच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे.

आज प्रख्यात प्रबोधनकार, प्रभावी वक्ते, कीर्तनकार, संघटक आणि समाजपरिवर्तनाच्या चळवळीतील ध्येयवेडे कार्यकर्ते डॉ. बालाजी जाधव

यांचा आज वाढदिवस. (३ ऑक्टोबर) या निमित्ताने त्यांच्या आजवरच्या जीवनप्रवासाकडे पाहताना मनात एक विचार प्रकर्षाने उमटतो— माणूस मोठा होतो तो केवळ त्याच्या पदामुळे, संपत्तीमुळे किंवा अधिकारामुळे नव्हे; तर समाजाच्या वेदना समजून घेऊन त्या वेदनांवर उपायव शोधण्यासाठी तो आपले आयुष्य किती प्रामाणिकपणे खर्च करतो, यावर त्याचे मोठेपण ठरते. डॉ. बालाजी जाधव यांचा प्रवास हा याच विचाराचा प्रत्यय देणारा आहे.

पेठवडज सारख्या साध्या ग्रामीण वातावरणातून सुरू झालेला त्यांचा जीवनप्रवास संघर्ष, परिश्रम, जिद्द आणि सामाजिक जाणिवांच्या संस्कारातून घडत गेला. परिस्थितीने अनेकदा माणसाची परीक्षा घेतली, तरी त्यांनी परिस्थितीला शरण जाण्याऐवजी तिच्यावर मात करण्याचा मार्ग स्वीकारला. अभ्यासाची ओढ, स्वतःच्या पायावर उभे राहण्याची जिद्द आणि समाजासाठी काहीतरी करण्याची अंतःप्रेरणा या गुणांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला.

शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगती करत त्यांनी वैद्यकीय क्षेत्राची वाट निवडली आणि डॉक्टर म्हणून आपली व्यावसायिक ओळख निर्माण केली. परंतु त्यांच्या आयुष्याची कहाणी येथेच थांबली नाही. कारण त्यांच्यासाठी डॉक्टर होणे हा केवळ व्यवसाय नव्हता; माणसाच्या शरीरावर उपचार करण्याबरोबरच समाजाच्या मनावर आणि विचारांवरही उपचार करणे ही त्यांच्या जीवनाची व्यापक भूमिका बनली. याच जाणिवेतून त्यांच्या सामाजिक कायार्ला दिशा मिळाली. विचारांचा वारसा आणि परिवर्तनाची वाट महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात फुले-शाहू-आंबेडकर यांच्या' विचारांनी समाजाला समतेची, शिक्षणाची आणि विवेकाची दिशा दिली. या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या परीने केले. त्याच प्रवाहातील एक प्रभावी नाव म्हणजे डॉ. बालाजी जाधव.

१९९०च्या दशकानंतर महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींमध्ये मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेड या संघटनांनी युवकांच्या सामाजिक जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. या चळवळीशी जोडले जाताना डॉ. जाधव यांनी केवळ संघटनेचे कार्यकर्ते म्हणून भूमिका बजावली नाही, तर विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम केले. ग्रामीण भागातील युवकांना संघटित करणे, त्यांच्यामध्ये शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, सामाजिक प्रश्नांकडे चिकित्सक नजरेने पाहण्याची सवय लावणे आणि इतिहासाकडे केवळ गौरवाच्या नव्हे तर चिकित्सक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देणे—या कामात त्यांनी स्वतःला झोकून दिले. इतिहास हा केवळ भूतकाळ नसतो; तो वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्याला घडविणारा आरसा असतो, या जाणिवेतून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांचा आणि कर्तृत्वाचा वारसा नव्या पिढीसमोर मांडला. त्यांच्या विचारांमध्ये स्वाभिमान होता; पण तो द्वेषावर आधारलेला नव्हता. त्यांच्या भाषणात आक्रमकता होती; पण तिच्यामागे सामाजिक प्रश्नांची तीव्र जाणीव होती. त्यांच्या भूमिकेत ठामपणा होता; पण त्या ठामपणामागे परिवर्तनाची तळमळ होती.

### शब्दांना कृतीची जोड

डॉ. बालाजी जाधव यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे शब्द आणि त्यांची कृती यांच्यातील सुसंगती. व्यासपीठावर उभे राहून बोलणे सोपे असते; परंतु त्या शब्दांची जबाबदारी आयुष्यभर पेलणे कठीण असते. डॉ. जाधव



यांनी हे आव्हान स्वीकारले. त्यांच्या भाषणांमध्ये केवळ टाळ्या मिळविण्यासाठीची शब्दांची आतषबाजी नसते. त्यामध्ये प्रश्न असतात, अस्वस्थता असते, आत्मपरीक्षणाची हाक असते आणि परिवर्तनाची दिशा असते. अंधश्रद्धा, जातीयता, सामाजिक विषमता, अन्याय, शैक्षणिक मागासलेपणा, बेरोजगारी आणि युवकांसमोरील आव्हाने अशा अनेक विषयांवर त्यांनी सातत्याने भूमिका मांडली.

विचार केवळ ऐकण्यासाठी नसतात; ते जगण्यासाठी असतात, ही भूमिका त्यांच्या कायार्तून जाणवते.

### प्रबोधनकार ते कीर्तनकार :

माध्यम बदलले, विचार नाही

काळ बदलतो, समाज बदलतो आणि समाजाशी संवाद साधण्याची माध्यमेही बदलतात. परंतु ज्यांच्या मनात विचारांची ज्योत प्रखर असते, ते माध्यम बदलले तरी आपला ध्येयमार्ग बदलत नाहीत. डॉ. बालाजी जाधव यांच्या प्रवासात हा बदल विशेष उल्लेखनीय आहे.

प्रभावी व्याख्याने आणि प्रबोधनातून समाजाशी संवाद साधल्यानंतर त्यांनी कीर्तन या पारंपरिक आणि लोकमानसाशी घट्ट जोडलेल्या माध्यमाचा स्वीकार केला.

पारंपरिक कीर्तनाच्या चौकटीत आधुनिक सामाजिक विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद, शिक्षण, समता आणि सामाजिक जबाबदारी यांची सांगड घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे कीर्तन हे केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक अभिव्यक्तीचे माध्यम न राहता प्रबोधन, आत्मपरीक्षण आणि सामाजिक जागृतीचे प्रभावी माध्यम होऊ शकते, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.

त्यांच्या कीर्तनातील शब्द लोकांच्या कानावर पडतात; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे ते अनेकदा मनात उतरतात.

टाळ-मृदंगाच्या नादातून विचारांची पेरणी आणि मनोरंजनातून प्रबोधन—ही त्यांच्या कीर्तनाची वेगळी ओळख म्हणावी लागेल.

### युवकांशी असलेले नाते

डॉ. जाधव यांच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा केंद्रबिंदू म्हणजे युवक. युवकांच्या हातात केवळ पदवी नव्हे, तर दिशा असली पाहिजे. त्यांच्या डोळ्यांत केवळ स्वप्ने नसून समाजाबद्दलची जबाबदारीही असली पाहिजे, असा त्यांचा दृष्टिकोन त्यांच्या कायार्तून दिसून येतो. शिक्षणाचे महत्त्व, करिअरच्या संधी, सामाजिक प्रश्नांची जाणीव, इतिहासाचे भान आणि संघटनात्मक कामाची शिस्त याबाबत त्यांनी अनेक युवकांशी संवाद साधला. एखाद्या तरुणाच्या आयुष्यातील योग्य वेळी उच्चारलेले दोन शब्द त्याचे संपूर्ण आयुष्य बदलू शकतात. डॉ. जाधव यांच्या शब्दांनी अशा कित्येक तरुणांना आत्मविश्वास दिला, दिशा दिली आणि काहीतरी सकारात्मक करण्याची प्रेरणा दिली, हीच त्यांच्या कार्याची खरी कमाई आहे.

### समाजासाठीची तळमळ :

व्यवसाय, कुटुंब आणि वैयक्तिक जबाबदाऱ्या सांभाळताना समाजासाठी वेळ देणे ही सोपी गोष्ट नाही. त्यासाठी मनात वेगळी आस्था आणि सामाजिक बांधिलकी असावी लागते. डॉ. जाधव यांनी आपल्या व्यावसायिक आयुष्याबरोबरच सामाजिक कार्याला महत्त्व दिले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरित करणे, गरजू आणि वंचित घटकांना मदतीचा हात देणे, युवकांना मार्गदर्शन करणे, व्याख्याने आणि कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न मांडणे—या सर्व माध्यमांतून त्यांची समाजाशी असलेली नाळ कायम राहिली. त्यांच्यासाठी समाजसेवा ही प्रसंगानुरूप केलेली कृती नसून जीवन जगण्याची एक पद्धत आहे. व्यक्तिमत्त्वातील सहजपणा मोठ्या विचारांचा माणूस मोठेपणाचा आव आणत नाही, हे डॉ. बालाजी जाधव यांच्या व्यक्तिमत्त्वात जाणवते. त्यांचा साधेपणा, सहज संवाद साधण्याची पद्धत, माणसांमध्ये मिसळण्याची वृत्ती आणि समोरच्या व्यक्तीला आपलेसे करून घेण्याची हातोटी हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष पैलू आहेत. व्यासपीठावर त्यांचा आवाज प्रभावी असतो; परंतु व्यासपीठाबाहेर त्यांचा स्वभाव तितकाच आपुलकीचा वाटतो.

विचारांत आक्रमकता असली तरी माणुसकीत आपलेपणा असणे— ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सुंदर बाजू आहे.

राजकारणाकडे पाहण्याची भूमिका

सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत राजकारणाची भूमिका महत्त्वाची आहे, हे त्यांनी जाणले. सत्ता ही अंतिम ध्येय नसून समाजहिताचे निर्णय घेण्यासाठीचे एक प्रभावी साधन असू शकते, या भूमिकेतून त्यांनी युवकांना सामाजिक आणि राजकीय प्रक्रियेत सक्रिय होण्याची प्रेरणा दिली. लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव ठेवावी, हा विचार अधिक व्यापक सामाजिक प्रबोधनाची मागणी करतो.

म्हणूनच त्यांचे कार्य केवळ एखाद्या संघटनेपुरते, एखाद्या व्यासपीठापुरते किंवा एखाद्या क्षेत्रापुरते मर्यादित राहिलेले दिसत नाही. शिक्षण, समाजकारण, सांस्कृतिक प्रबोधन, संघटन आणि युवकजागृती या विविध प्रवाहांना जोडण्याचे काम त्यांच्या कायार्तून झाले आहे.

एका व्यक्तीपेक्षा एक विचारप्रवाह डॉ. बालाजी जाधव यांच्याकडे पाहताना केवळ एक वक्ता, डॉक्टर, प्रबोधनकार किंवा कीर्तनकार म्हणून पाहणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कर्तृत्व कमी करून पाहण्यासारखे ठरेल.

ते एका विचारप्रवाहाचे वाहक आहेत.:त्यांच्या हातातील माईक असो, कीर्तनातील टाळ असो किंवा समाजातील एखाद्या प्रश्नावर मांडलेली भूमिका असो—त्यामागे एकच ध्यास दिसतो : समाज अधिक विवेकी, समताधिष्ठित, शिक्षित आणि स्वाभिमानी व्हावा.

समाजपरिवर्तनाची प्रक्रिया कधीच एका दिवसात घडत नाही. एखाद्या व्याख्यानाने क्रांती होत नाही आणि एखाद्या कीर्तनाने समाज बदलत नाही. पण एक विचार एका मनात रुजतो, ते मन दुसऱ्या मनाला जागवते आणि अशा हजारो जागृत मनांतून परिवर्तनाची चळवळ उभी राहते. डॉ. बालाजी जाधव यांचे कार्य याच विचारपेरणीचे कार्य आहे.

आजच्या वाढदिवशी...

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना केवळ दीर्घायुष्याची प्रार्थना करून थांबावेसे वाटत नाही. कारण त्यांच्या आयुष्याची खरी ओळख वर्षांच्या संख्येत नाही, तर त्यांनी किती मने जागवली, किती युवकांना प्रेरणा दिली आणि समाजाच्या विचारविश्वात किती प्रश्न निर्माण केले, यात आहे.

त्यांनी आजवर प्रज्वलित ठेवलेली विचारांची ज्योत अशीच तेवत राहो. त्यांच्या शब्दांना अधिक व्यापक समाजसंवादाची शक्ती लाभो. त्यांच्या कीर्तनातून विवेकाचा स्वर अधिक बुलंद होवो. त्यांच्या व्याख्यानातून नव्या पिढीला दिशा मिळत राहो आणि त्यांच्या कायार्तून सामाजिक समतेची, शिक्षणाची आणि परिवर्तनाची वाट अधिक प्रकाशमान होत राहो.

काही माणसे स्वतःसाठी जगतात, काही आपल्या कुटुंबासाठी जगतात; पण काही माणसे आपल्या काळासाठी जगतात.

डॉ. बालाजी जाधव हे आपल्या काळासाठी जगणाऱ्या त्या मोजक्या माणसांपैकी एक आहेत.

त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहताना एकच भावना मनात येते—

'विचार जिवंत असतील, तर परिवर्तनाची आशा जिवंत असते; आणि विचारांची मशाल घेऊन चालणारी माणसे असतील, तर समाजाचा प्रवास कधीच अंधारात हरवत नाही.'

अशा या समाजपरिवर्तनाच्या प्रवासातील अग्रगण्य व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

— आपला,

**प्रा. डॉ. पुंडलिक कोलते**

पान १ वरून

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे १०० टक्के...

आहे, त्यांच्या शंभर टक्के क्षेत्राचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत. यामध्ये केवळ पिकांचेच नव्हे, तर ऊस, फळबागा तसेच अन्य पिकांच्या नुकसानग्रस्त क्षेत्राचाही समावेश करावा. कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. पंचनामे करताना वस्तुस्थितीची अचूक नोंद घ्यावी. अशा आपत्तीच्या परिस्थितीत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी संवेदनशीलता ठेवून जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री श्री. गोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

**गार्डी गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी तलावात पाणी सोडण्याचे निर्देश**

पंढरपूर तालुक्यातील गार्डी गावाला कासाळ ओढ्यावरील तलावातून पाणीपुरवठा केला जातो. दुष्काळी परिस्थितीत गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित तलावात पाणी सोडण्याबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी प्रशासनाने आवश्यक नियोजन करावे, असेही त्यांनी सूचित केले.

**गुरसाळे येथे ग्रामस्थांचे निवेदन स्वीकारले**

पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथे पालकमंत्री श्री. गोरे यांनी थांबून ग्रामस्थांशी संवाद साधला. ग्रामस्थांनी यावेळी आपल्या विविध मागण्या व समस्या मांडणारे निवेदन त्यांना दिले. स्थानिक प्रश्नांची माहिती घेऊन संबंधित यंत्रणांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणे, पीक नुकसानीचे अचूक मूल्यांकन करणे आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता निश्चित करणे याला शासनाचे प्राधान्य आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून शेतकरी व नागरिकांना आवश्यक मदत वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

यावेळी आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील, माजी आमदार शहाजी पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, प्रांताधिकारी अमित माळी, तहसीलदार बाळूबाई भागवत, तालुका कृषी अधिकारी दीपाली जाधव, गटविकास अधिकारी अमोल जाधव, योगेश कांबळे, पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व ग्रामस्थ-शेतकरी उपस्थित होते.

## शिक्षण क्षेत्रातील रसगंध व्यक्ती दशरथ गोप यांचा सत्कार सोहळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी शिक्षण संस्थेचे गेल्या 33 वर्षापासून सचिव पदाची धुरा सांभाळत आहेत. धाडसी नेतृत्व, अभ्यासू व्यक्ती, उत्कृष्ट मार्गदर्शक, सल्लागार, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील वचनबद्ध, रसगंध व्यक्तिमत्व अशा दशरथ गोप यांचा आज जन्मदिवस. दशरथ गोप मित्र परिवाराकडून वाढदिवसानिमित्त सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड्. श्रीनिवास क्यातम यांच्या हस्ते दशरथ गोप यांचा शाल व श्रीफळ देऊन सपत्नीक गौरव व सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमा प्रसंगी कन्या प्रशालेचे सहशिक्षक विश्वनाथ काळे यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ नारायणराव कुचन प्राथमिक शाळेच्या एका खोलीच्या बांधकामासाठी ७ लाख देणगी जाहीर करून १ लाख रुपयाचा धनादेश संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्या कडे सुपूर्द केला.




यावेळी मधुकर कट्टा गणेश गुज्जा, अरविंद कुचन, नागनाथ गंजी, प्रभाकर आरकाल, मल्लिकार्जुन सरगम, श्रीनिवास जोग, अंबादास गज्जम, दिनेश यन्नम, हरीष कोंडा, प्रा. श्रीनिवास कोंडी, श्रीनिवास इप्पाकायल, रामदास इप्पाकायल, पांडुरंग दिड्डी, श्रीधर चिट्याल, गोवर्धन कमटम, नरेश श्रीराम, विजयकुमार गुल्लापल्ली, दत्तात्रय यन्नम, निलेश सरगम, व्यंकटेश आकेन, श्रीनिवास गड्डम, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंडयाल, डॉ.सुर्यप्रकाश कोठे, नागेश वल्याळ, काशीनाथ गड्डम, शामसुंदर विन्नू, अभंग सर, महेश सरवदे, श्रावण बिराजदार, विद्यानंद स्वामी, वैजनाथ हत्तुरे, श्रीपाद सुरवसे भालचंद्र म्हेत्रे, संतोष सोमा, श्रीनिवास वासुदेव गड्डम, काळे सर मित्रपरिवार, ओम बहुउद्देशीय संस्था, सौ. इंदिरा कुडक्याल, दत्तात्रय कुंटला, मधुकर गवळी, मेघनाथ येमूल, शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे वरिष्ठ लिपिक नितीन वारे, सोनवणे, नवनीत एजन्सीचे कुलकर्णी, श्रीनिवास कर्रे, राजशेखर गुंडेली, संतोष किल्लेदार, वैकुंठम जडल, शामकुमार बेनगिरी, विष्णू कारमपुरी, डॉ राजेंद्र शेंडगे, राजेश मामड्याल, अंबादास राजूल, संतोष उदगिरी, लक्ष्मीकांत उदगिरी, सत्यनारायण गुर्रम, शंकर चौगुले, विजय चिप्पा, गोपाळ मुडद्दिड्डी, मोहन डांगरे, प्रशांत फत्तेपूरकर, तिरुपती परकीपंडला, लोकमतचे संपादक देसाई, रोहित बिटला, इस्माईल चामाकोरा, नारायण येरवा, संतोष चन्ना पंतुलु, भास्कर पिठ्ठा, गौतम संगा, ज्ञानेश्वर म्याकल, सिद्धेश्वर तरुण मंडळ, गजानन घोडके, मनोज पिसके, दत्तात्रेय गोटीपामूल, अंजीखाने, गजानन महाराज संस्था सोलापूर, सरस्वती क्लासेस, संजय साळुंखे मुरलीधर मडूर,राजू कोमाकूल, विशाल पल्ली, राजेश नामपेल्ली, अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे खोबरे साहेब, अनिल अं पल्ली, अजय कोंकत्ती, दत्तात्रय गुंडला, सुदर्शन कोंपेल्ली, पेंटप्पा गज्जम, अरविंद बोमड्याल, श्रीनिवास गोसकी, अशोक यन्नम, राजेश संगा, अंबादास कैंची, श्रीधर बोल्ली, आत्माराम चिप्पा, लक्ष्मीनारायण गोप, कुसेकर संभारम, अंबादास गुत्तीकोंडा, सुनिल कोंडा बिल्डर, केतन द्यावनपल्ली, कृष्णाहरी चिलका, शिवराज दासी, अशोक इंदापुरे, गिरीष कोटा पेंटर, श्रीनिवास यल्ला, पत्रकार श्रीनिवास दासरी, वेणुगोपाल गाडी, अनिल गंजी सर, संतोष येमूल, चंद्रशेखर ईराबत्ती, रमेश केदारी, वासुदेव इप्पलपल्ली, ॲड्. श्रीनिवास कटकूर, श्रीनिवास पेंबर्ती, विवेक कुडक्याल, सुर्योदय मंडळ, हिरालाल गंजी, चंद्रकांत केदारी, गवई पेठ नवरात्र मंडळ, देवयानी, सुधाकर गुंडेली, वेणुगोपाल जिंदम, प्रसाद फोटो, श्रीनिवास सिध्दम, गोपी आचारी, प्रसाद बंडी, वेणुगोपाल जिल्ला पंतुलू श्रीनिवास कुडक्याल, शेखर कटकम, श्रीराम चॅरिटेबल ट्रस्ट, अंबादास हिंदी, गणेश पेनगोंडा, बिटला, सदाफुले सर, बालाजी दासरी, सिध्देश्वर कमटम, सुखकर्ता मित्र मंडळ,प्रकाश डांगे संभाजी आरमार तसेच संस्था संचालित सर्व शाखेचे प्राचार्य, मुख्याध्यापक, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी इ. उपस्थित होते.

## वात्रटिका

### कुठे जाणार आहोत..

बदलून गेली दुनिया
पुढेही बदलणार आहे...
ती लोकांना की लोक
तिला कुठे घेऊन जाणार...
त्या कोपऱ्यात तंटा आहे
इकडेही डोंब उसळला...
प्रेमाचा शेजार कमी झाला
निसर्गही धग घेऊन कोसळला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सागर सिमेंट्सच्या 'पीपीसी सुपर सिमेंट रिटेलर स्कीम' चा बक्षीस वितरण समारंभ थाटात संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नामांकित सिमेंट उत्पादक कंपनी सागर सिमेंट्स लिमिटेड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्ष २०२५-२६ च्या 'पीपीसी सुपर सिमेंट रिटेलर स्कीम'चा (PPC Super Cement Retailer Scheme) भव्य बक्षीस वितरण समारंभ नुकताच उत्साहात पार पडला.




कंपनीच्या व्यवसाय वृद्धीत मोलाचे योगदान देणाऱ्या रिटेलर्स आणि डीलर्सचा गौरव करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या समारंभाला सागर सिमेंट्सचे महाराष्ट्र राज्य स्टेट हेड श्री महादेव कोगनुरे, कंपनी मार्केटिंग अधिकारी, डीलर्स, आणि मोठ्या संख्येने रिटेलर बांधव उपस्थित होते.

**उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या रिटेलर्सचा सन्मान**

वर्षभरात सागर पीपीसी सुपर सिमेंटची विक्रमी विक्री करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या रिटेलर्सना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये भाग्यवान विजेत्यांना इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि इतर गृहोपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात आले.

**रिटेलर्स हे कंपनीचे बलस्थान**

कार्यक्रमात बोलताना सागर सिमेंट्स महाराष्ट्र राज्य स्टेट हेड श्री महादेव कोगनुरे यांनी सर्व रिटेलर्सचे आभार मानले. "ग्राहकांपर्यंत उच्च दर्जाचे सिमेंट पोहोचवण्यात आणि सागर सिमेंट्सला घराघरांमध्ये लोकप्रिय करण्यात आमच्या रिटेलर्सचा सर्वात मोठा वाटा आहे.

रिटेलर्स हेच कंपनीचे खरे बलस्थान असून, त्यांच्या पाठीशी कंपनी नेहमी खंबीरपणे उभी राहील," असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**रिटेलर्सकडून आनंद व्यक्त**

कंपनीकडून मिळालेल्या या सन्मानामुळे उपस्थित रिटेलर्सनी अत्यंत आनंद व्यक्त केला. सागर सिमेंटच्या दर्जेदार गुणवत्तेमुळे ग्राहकांचा या ब्रँडवर मोठा विश्वास असून, आगामी काळातही कंपनीसोबतचे व्यावसायिक संबंध अधिक दृढ करू, अशी प्रतिक्रिया विजेत्या रिटेलर्सनी दिली.

मनोरंजक कार्यक्रम आणि स्नेहभोजनाने या सोहळ्याची सांगता झाली

# ३० वर्षांचा पाणीप्रश्न आ. अभिजीत पाटील यांच्या पाठपुराव्याने अवघ्या ८ दिवसांत मार्गी

**माढा (कटूसत्य वृत्त):-** जाधववाडी-मोडनिंब येथील गावठाण तलाव भरून संपूर्ण गावाला पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी ग्रामस्थ गेल्या ३० वर्षांपासून संघर्ष करत होते. अनेक वर्षांचा हा प्रलंबित प्रश्न अखेर आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या पुढाकारातून मार्गी लागला आहे. काही दिवसांपूर्वी ग्रामस्थांनी आमदार अभिजीत आबा पाटील यांच्याकडे पाईपलाईनची मागणी केली. ग्रामस्थांची मागणी ऐकून घेत आमदारांनी तातडीने पाठपुरावा केला आणि अवघ्या आठ दिवसांत पाईपलाईन जाधववाडीपर्यंत पोहोचवून दिली.

या पाईपलाईनमुळे गावठाण तलावात पाणी आणणे शक्य होणार असून, जाधववाडी तसेच परिसरातील आजूबाजूच्या गावांनाही याचा मोठा फायदा होणार आहे.



त्यामुळे गेल्या तीन दशकांपासून पाण्यासाठी सुरू असलेल्या संघर्षाला आता प्रत्यक्ष कामाच्या माध्यमातून दिशा मिळाली आहे. ग्रामस्थांची मागणी, आमदारांचा तातडीचा पाठपुरावा आणि अवघ्या आठ दिवसांत प्रत्यक्ष पाईपलाईन — हा विकासकामातील गतिमान कार्यपद्धतीचा प्रत्यय आहे

या पाईपलाईनचे आज ज्येष्ठ नेते भारत आबा शिंदे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी बाबुतात्या सुर्वे, पंचायत समिती सदस्य बालाजी पाटील, कुरण गिड्डे, शिवाजी सुर्वे, नितीन गडधरे, संतोष दळवी,प्रवीण माने, विठ्ठल मोरे, सौदागर जाधव, राजकुमार जाधव, अभिजीत जाधव,उदय जाधव, संतोष मुटकुळे, संभाजी काळे, अख्तर तांबोळी, निलेश काळे, महादेव मोरे, अरुण सोमासे, नंदकुमार लादे, बाळासाहेब सोमासे, गंगाधर जाधव, माने महाराज, अंकुश जाधव, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. जाधववाडीच्या पाणीप्रश्नासाठी तातडीने पुढाकार घेतल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार अभिजीत आबा पाटील यांचे आभार मानले.

# आगामी जनगणनेत OBCची स्वतंत्र जातनिहाय गणना करण्याची मागणी; राष्ट्रपतींकडे निवेदन

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** आगामी जनगणना २०२७ मध्ये इतर मागासवर्गीय (OBC) समाजाची स्वतंत्र जातनिहाय गणना करण्यात यावी, यासाठी स्वतंत्र कॉलम, प्रमाणित जात कोडिंग आणि 'मास्टर कास्ट रजिस्ट्री' ची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी युनिटी ऑफ मूलनिवासी समाज या संघटनेच्या वतीने राष्ट्रपतींकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. भारताच्या संविधानातील सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी आगामी जनगणना प्रक्रियेत इतर मागासवर्गीय



(OBC) समाजाच्या जातनिहाय आकडेवारीचा समावेश करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संविधानातील अनुच्छेद ३४० नुसार मागासवर्गीयांच्या स्थितीची ओळख व त्यांच्या कल्याणाची जबाबदारी राज्यावर आहे. तसेच अनुच्छेद १५(४) आणि १६(४) अंतर्गत मागासवर्गीयांना शैक्षणिक व सामाजिक विकास तसेच सार्वजनिक सेवांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व देण्यासाठी प्रमाणित आणि वैज्ञानिक आकडेवारी आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. स्वातंत्र्यानंतर इतर मागास वर्गाचा (OBC) अचूक आणि अद्ययावत जातनिहाय डेटा उपलब्ध नसल्याने संबंधित समाजासाठी आखण्यात येणाऱ्या धोरणांचा आणि कल्याणकारी योजनांचा अपेक्षित लाभ योग्य पद्धतीने पोहोचत नसल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेत OBC, MBC आणि घुमंतू जनजातींच्या गणनेसाठी स्वतंत्र व्यवस्था नसल्याचा मुद्दाही निवेदनात मांडण्यात आला आहे. SC/ST प्रमाणे 'ड्रॉप डाउन मेन्यू' चा पर्याय उपलब्ध नसल्याने OBC जातींची वास्तविक आणि वैज्ञानिक आकडेवारी संकलित होण्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर OBC समाजाची स्वतंत्र जातनिहाय गणना, स्वतंत्र कॉलम, प्रमाणित जात कोडिंग आणि मास्टर कास्ट रजिस्ट्रीसह निवेदनातील आठ प्रमुख मागण्यांचा आगामी जनगणनेच्या आराखड्यात समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांचा विचार करून त्यासाठी राष्ट्रपतींनी तातडीने हस्तक्षेप करावा, असे आवाहनही निवेदनाद्वारे करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या सूचनेनुसार महसूल कार्यालयांमध्ये स्वच्छता मोहीम

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती तसेच सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखा तसेच तालुकास्तरावरील महसूल कार्यालयांमध्ये आज व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयासह विविध तहसील कार्यालये आणि उपविभागीय अधिकारी कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपल्या कार्यालयांची तसेच परिसराची स्वच्छता केली.

जिल्हाधिकारी कार्यालय, तालुकास्तरीय महसूल कार्यालय तसेच प्रशासकीय इमारतीमध्ये जिल्हा माहिती कार्यालयासह विविध विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छता अभियानात सहभाग नोंदविला. जिल्हाधिकारी कार्यालयातील आस्थापना शाखा, सामान्य प्रशासन शाखा तसेच अन्य विभागांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी संबंधित शाखांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यालयीन कक्षांची स्वच्छता करून कागदपत्रांची योग्य मांडणी, अनावश्यक साहित्याची विल्हेवाट आणि परिसर स्वच्छ ठेवण्यावर भर दिला.



उत्तर तहसील कार्यालय, पंढरपूर तहसील कार्यालय आणि मोहोळ तहसील कार्यालयातही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या कार्यालयांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयाच्या अंतर्गत भागासह बाहेरील परिसराची स्वच्छता केली. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय क्रमांक एक आणि क्रमांक दोन येथेही स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या कार्यालयांमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन परिसर स्वच्छ व नीटनेटका करण्यासाठी श्रमदान केले. काही कार्यालयांमध्ये स्वच्छतेपूर्वी आणि स्वच्छतेनंतरची छायाचित्रे घेऊन मोहिमेतील बदलही नोंदविण्यात आला.

या स्वच्छता मोहिमेत प्रांताधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार सदाशिव पडदुने, तहसीलदार निलेश पाटील, तहसीलदार सचिन लंगोटे, तहसीलदार सचिन मुळीक, जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार पूनम दिंडोले, तहसीलदार बालाजी बनसोडे यांच्यासह विविध महसूल कार्यालयांतील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

शासकीय कार्यालये ही नागरिकांच्या सेवेसाठी महत्त्वाची केंद्रे असून, ती स्वच्छ, सुंदर व नीटनेटकी असणे आवश्यक आहे. स्वच्छता ही केवळ अभियानापुरती मर्यादित न राहता कार्यालयीन संस्कृतीचा भाग व्हावी, या उद्देशाने जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सर्व महसूल कार्यालयांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार जिल्ह्यातील विविध कार्यालयांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सामूहिक श्रमदानातून स्वच्छतेचा संदेश दिला.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून प्रशासकीय कामकाजाबरोबरच सामाजिक जबाबदारी, स्वच्छता आणि सार्वजनिक परिसराच्या सुयोग्य व्यवस्थापनाबाबत अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

# वचनपूर्ती बद्दल चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने महापौरांचा सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे कर्तृत्ववान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २२ जुलै २०२६ रोजी भवानी पेठेतील जय भवानी प्रशालेतील विद्यार्थ्यांना महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते व चौडेश्वरी पतसंस्थेचे चेअरमन लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी यांच्या अध्यक्षतेखाली गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना चन्नवीर चिट्टे यांनी जय भवानी प्रशालेची दुरावस्था महपौरांसमोर मांडून याप्रकरणी लक्ष घालण्याचे आवाहन केले



होते. शाळेची इमारत जीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे महापौरांच्या निदर्शनास आणून दिले होते. महापौर विनायक कोंड्याल यांनी आपल्या भाषणात यासर्व बाबींचा ऊहापोह करून लवकरात लवकर शाळा दुरुस्ती करण्यासंदर्भात वचन दिले होते. या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी योग्य ते नियोजन करून त्या सर्वांची सोय करण्यात येईल असा शब्द त्यांनी आपल्या भाषणात दिला होता. महापौरांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजी मनपा आयुक्त डॉ. सचिन ओंबासे व इतर पदाधिकारयांसोबत जय भवानी प्रशालेची पाहणी करून त्याठिकाणी नविन ०८ वर्ग खोल्या बांधण्यात येणार असल्याचे जाहिर करून प्रशासनाला तसा आदेश दिला आणि येणाऱ्या सर्वसाधारण सभेत त्यास मान्यता देण्यात येईल असे जाहिर केले. महापौरांना आपला शब्द पाळला व जय भवानी प्रशालेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा दिला म्हणून चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने महापालिकेत जावून महापौर विनायक कोंड्याल व पक्षनेते मा. नरेंद्र काळे यांचा सत्कार केला. या सत्काराप्रसंगी बोलताना चन्नवीर चिट्टे यांनी महापौर व मनपा प्रशासनाचे कौतुक करून दिलेला शब्द पाळल्याबद्दल महापौरांचे आभार मानले.

यावेळी मित्र परिवाराचे सदस्य नागेश बडदाळ यांच्या वाढदिवसानिमित्त महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. या सत्कार समारंभास चौडेश्वरी पतसंस्थेचे चेअरमन लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी, नागेश ताटी, श्रीनिवास दासरी, गुरूनाथ कोळी, नागेश बडदाळ, साईनाथ सज्जे, परमेश्वर क्षीरसागर, रवि शहापूरकर, सद्दाम कोसगीकर, सोमनाथ कलशेट्टी, नितीन हलसगी , अंबादास पाटील आदी उपस्थित होते.

# कीर्तनातून प्रसिद्ध झालेल्या तरुणीची अनोखी गोष्ट

## 'पाच फुटाचा बच्चन' चा ट्रेलर लॉन्च

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** कीर्तनातून जनमानसात प्रसिद्ध झालेल्या एका तडफदार तरुणीची कथा सांगणाऱ्या 'पाच फुटाचा बच्चन' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख यांच्या उपस्थितीत दिमाखात लॉन्च करण्यात आला. टीझरला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर ट्रेलरमुळे चित्रपटाविषयीची उत्सुकता वाढली आहे.

रंगमंचावर एकपात्री नाटक म्हणून सुरू झालेला 'पाच फुटाचा बच्चन' चा प्रवास आता रुपेरी पडद्यापर्यंत पोहोचला आहे. चित्रपटात संतांचे अभंग मुखोद्गत असलेल्या आणि कोल्हापुरी भाषेच्या खास बाजातून कीर्तन करणाऱ्या तरुणीची कथा मांडण्यात आली आहे. पाच फूट उंचीच्या या तडफदार कीर्तनकार मुलीला जनमानसात 'पाच फुटाचा बच्चन' म्हणून ओळखले जाते.

टीझरमधील 'रिस्क घ्यायला पाहिजे राज' हा संवाद चर्चेत आला असून आदर्श शिंदे यांच्या आवाजातील चित्रपटातील गाण्यालाही रसिकांचा प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटातून श्रुती मधुदीप अभिनेत्री म्हणून पदार्पण करत आहे.




गौरी नलावडे, शशांक शेंडे, चिन्मयी सुमित, क्षितिज दाते, पुष्कराज चिरपुटकर, किशोर कदम यांच्यासह अनेक कलाकारांच्या भूमिका आहेत. राहुल कर्णिक आणि ऑर्फियस स्टुडिओज निर्मित या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन कौस्तुभ रमेश देशपांडे यांनी केले आहे.

पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, कोल्हापूर आणि पुणे येथे चित्रपटाचे चित्रीकरण झाले असून कीर्तनकार तरुणीचा संघर्ष, प्रसिद्धीचा प्रवास आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीची झलक या चित्रपटातून पाहायला मिळणार आहे. ९ ऑक्टोबरला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**
**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**
**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल
**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू


**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) भारतीय क्रिकेटमधील एक माजी फलंदाज, इरफान पठाणचा भाऊ २) आशिर्वाद, नवरा मुलगा ३) पाणी, उदक ४) राजाचे दरबारातील बसण्याचे आसन ५) बंदूक (इंग्रजीत) ६) पाणी पिण्याची तीव्र इच्छा ७) सोने ८) चिखल, राडा ११) एकरूप, तल्लीन १३) शिजवलेला तांदूळ १५) राहुल गांधी यांचे चुलतबंधू १७) कोकणातील भाजपचे आमदार-नितेश ** १९) जहाज २०) स्वामी तिन्ही जगाचा आईविना *** २२) चार आणि तीन मिळून होणारी संख्या २५) शिवसेनेचे महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री २६) जोराची आरोळी (हिंदीत)२९) कर्नाटकातील एक जिल्हा ३१) अहमदनगरचे खासदार-*** विखे ३२) ज्ञान (हिंदीत) ३३) जर उलट लिहा ३५) वायू, पवन ३९) राष्ट्रवादीचे निवडणूक चिन्ह ४१) हनुमानाच्या हातातील शस्त्र ४३) ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे जावई-सदानंद ** ४४) मराठी वर्षातील एक महिना ४५) पारंब्या असलेला वृक्ष ४६) फळ्यावर लिहिण्यासाठी हा वापरतात ४७) पत्र (हिंदीत) ४८) एक हजार कि.ग्रॅ.- एक ** ४९) शरीर, काया

**आडवे शब्द :** १) भारतीय क्रिकेट टीममधून निवृत्त झालेला एक डावखुरा फलंदाज
६) नशीब (हिंदीत)
९) गाण्यातील लय, एक जुना ग्रामीण खेळ-** पारंब्या
१०) बारीकसारीक
१२) एक म्हण-** तो कान पिळी१४) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा
१६) भाकरी थापण्याचे मोठे पात्र १८) शहर
२१) मुंबई लगतचा एक जिल्हा
२३) लहान बाळाला टोचतात ती २४) उत्सवाचा दिवस २५) स्वार्थ, हेतू
२७) उन्हाळ्यातील एक महिना २८) कौरवांची आई ३०) वाईट सवय, तल उलट लिहा ३१) भाजप नेते -*** मुनगंटीवार ३२) अकरा (हिंदीत)
३४) पाकचे एक माजी पंतप्रधान-*** शरीफ ३६) पाण्याचे बाष्परूप ३७) दृष्टी
३८) रांग ४०) छ. शिवरायांच्या राजधानीचा किल्ला
४२) ऋतिक रोशन अभिनीत एक चित्रपट-** - अकबर ४४) आईची बहीण
४६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ४९) तलाव ५०) केळांचा समूह
५१) बेसनाच्या पिठाच्या बुंदीपासून बनवितात तो गोलाकार गोड पदार्थ
५२) भारताचा एक माजी विकेटकिपर-*** मोंगिया

## सुडोकु - 67

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | | | | 8 | | 2 |
| 7 | | | 4 | 2 | 8 | | 9 | 6 |
| 2 | 1 | | | 3 | | 7 | | 5 |
| | 3 | 1 | | | | 9 | 8 | |
| | | | 1 | | | | | 7 |
| 8 | 2 | | 9 | 5 | | | | 3 |
| 3 | | | | | 2 | | 6 | |
| | 8 | 5 | | 7 | 6 | | | |
| 9 | | 2 | 5 | | 1 | 3 | | 8 |

# पत्रकारांच्या घरांच्या किमती कमी करण्याबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**नागपूर कटूसत्य वृत्तः** नागपूर येथील 'रामगिरी' या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी रविवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सोलापूरातील पत्रकारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत साकारण्यात येत असलेल्या घरांच्या किमती कमी करण्याबाबत सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.



यावेळी सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विठ्ठलाची मूर्ती देऊन सन्मान केला पत्रकारांच्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन घरांच्या किमती सर्वसामान्य पत्रकारांना परवडतील अशा पातळीवर आणाव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी राज्य श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रदीपदादा मैत्र यांच्यासह राज्यातील विविध श्रमिक पत्रकार संघांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# अकलूज आरटीओच्या तपासणी पथकाची अपघातग्रस्तांना तातडीची मदत

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** 3 ऑक्टोबर 2026 रोजी पहाटे सुमारे साडेचार वाजता अकलूज आरटीओ कार्यालयाच्या तपासणी पथकास माळशिरस- वेळापूर रस्त्यावर वेळापूर नजिक एक तरुण रक्तबंबाळ अवस्थेत मदत मागताना आढळला. पथकातील अधिकाऱ्यांनी तातडीने आपले वाहन या युवकाच्या मदतीसाठी थांबवले. त्यावेळी तेथे मोटार वाहन क्रमांक MH-14 FS 4864 हे रस्त्याच्या कडेला चारीमध्ये गेल्याचे आढळले.या वाहनाच्या बाजूला आणखी एक युवक अत्यावस्थेत पडलेला आढळला.या अवस्थेतील तरुणाच्या मदतीसाठी रुग्णवाहिकेची आवश्यकता असल्याची गरज तपासणी पथकाच्या लक्षात आली.त्यानंतर तपासणी पथकातील अधिकारी



यांनी तातडीने आपत्कालीन रुग्णवाहिका क्रमांक 108 व महामार्ग मदत क्रमांक 1033 यावर कॉल करून दोन्ही रुग्णवाहिका अपघातस्थळी बोलावून घेतल्या कारमधील तोहीन अजमल गावंडे (वय २१), मुस्तकीन बबलु गावंडे (वय २२), यश बंडू वाघमारे (वय २१),स्वप्निल महादेव कोळी (वय २१) या चारही जखमी तरुणांना पुढील उपचारासाठी अकलूज येथील रुग्णालयात उपचारासाठी तातडीने रवाना केले.

मदत करत असताना वाहनात आढळलेल्या आधार कार्ड वरून सदर वाहनातील तरुण हे जत (जि.सांगली) येथील असल्याचे आढळले.रस्त्यावर अपघात झाल्याचे पाहून पाठीमागून येणाऱ्या काही वाहनाचे चालक मदतीसाठी थांबले.सुदैवाने त्यातले दोघेजण हे जतचे होते.त्यांच्या मदतीने अपघातग्रस्त युवकांच्या घरी संपर्क करून अपघात झाल्याचे कळविण्यात आले आहे.हे संपूर्ण मदत कार्य स्थानिक नागरिक व पोलीस यांच्या मदतीने आरटीओ कार्यालयप्रमुख संदीप म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनात तपासणी पथकातील अधिकारी सहायक मोटार वाहन निरीक्षक शिवाजी लाळगे व सहायक मोटार वाहन निरीक्षक कांतीलाल गरगडे,वाहन चालक बाबू झणझण यांनी पार पाडले.

# विठ्ठलवाडीच्या श्री विठ्ठल वाचनालयात गांधी व शास्त्री जयंती साजरी



**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील शासकीय अधिकारी व नोकरदारांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विठ्ठलवाडी येथील श्री विठ्ठल सार्वजनिक वाचनालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन वाचनालयाचे माजी अध्यक्ष आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड सर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड सर यांनी सांगितले की, थोर महापुरुषांचे महान कार्य व विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. महापुरुषांप्रमाणे प्रत्येकाने आपले ध्येय गाठण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न व पाठपुरावा केला पाहिजे. गावोगावचे पदाधिकारी व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या कृतीतून व आचरणातून सामाजिक आदर्श प्रस्थापित केला पाहिजे.

गावोगावच्या ग्रामपंचायत, विकास सोसायटी, पतसंस्था, वाचनालये आदी सार्वजनिक संस्थांमध्ये थोर महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथीचे औचित्य साधून विविध प्रकारचे उपक्रम राबविणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष रामचंद्र भांगे,उपाध्यक्ष बालाजी गव्हाणे,सचिव नेताजी उबाळे,भारत कोकाटे, शिवाजी जाधव,शिवाजी कोकाटे,ग्रंथपाल अमोल जाधव,पतसंस्थेचे संचालक अविनाश माने,मॅनेजर भिमराव नागटिळक, गोपीनाथ मस्के,धनाजी शेंडगे,बबलू शेंडगे यांच्यासह ग्रामस्थ व वाचनालयाचे सभासद उपस्थित होते.

# श्रमिकांच्या लॉंग मार्चला ऐतिहासिक रूप द्या! कॉ. आडम मास्तरांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** स्वातंत्र्यपूर्व काळात जुलमी ब्रिटिश सत्तेविरोधात सोलापूरच्या भूमिपुत्रांनी एकजुटीची वज्रमूठ बांधून ऐतिहासिक लढा उभारला. या क्रांतिकारी परंपरेची पार्श्वभूमी असलेल्या सोलापूरच्या भूमीतून आता श्रमिक-कष्टकऱ्यांचा लॉंग मार्च मुंबई मंत्रालयावर धडकणार आहे. हा लॉंग मार्च ऐतिहासिक आणि अभूतपूर्व करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी दिवस-रात्र एक करून मेहनत घ्यावी आणि श्रमिकांचा हा लढा यशस्वी करावा, असे आवाहन ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन करून शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी लढाऊ कार्यकर्त्यांचा निर्धार मेळावा माजी नगरसेविका कॉ. नलिनीताई कलबुर्गी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी कॉ. आडम मास्तर बोलत होते.

कॉ. आडम मास्तर पुढे म्हणाले की, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सर्व महापुरुषांना अभिवादन करून पुणे नाका येथून मुंबई मंत्रालयाकडे लॉंग



मार्चला सुरुवात होणार आहे. या लॉंग मार्चमध्ये सहभागी श्रमिक-कष्टकऱ्यांसाठी वैद्यकीय सुविधा, दररोज चहा, नाश्ता, जेवण तसेच मुक्कामाची व्यवस्था करण्यात येणार आहे. यासह इतर आवश्यक सुविधांचीही व्यवस्था केली जाणार असून, त्यासाठी पक्षाचे सुमारे १,००० स्वयंसेवक व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळणार आहेत.

लॉंग मार्चसाठी लागणारा खर्च लोकवर्गणीतून संकलित करण्यात येणार आहे.

प्रत्येक कार्यकर्त्याने आपली जबाबदारी ओळखून हे काम तडीस नेण्याचा निर्धार करावा, असे आवाहनही कॉ. आडम मास्तर यांनी केले.

मेळाव्यात किशोर मेहता, विल्यम ससाणे, बापू साबळे, हसन शेख, प्रदीप मरेड्डी यांच्यासह अन्य लढाऊ कार्यकर्त्यांनी लॉंग मार्चच्या यशस्वी नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. समाजमाध्यमांद्वारे प्रसार-प्रचार, आंदोलकांची नोंदणी, प्रशासकीय व्यवस्था तसेच लॉंग मार्चच्या नियोजनाबाबत विविध सूचना करण्यात आल्या.

लॉंग मार्चमध्ये मोठ्या संख्येने श्रमिक-कष्टकऱ्यांचा सहभाग नोंदविण्यासाठी विडी कारखाने, यंत्रमाग कारखाने, घरोघरी व वस्तीपातळीवर गटचर्चा, कॉर्नर सभा, रिक्षा प्रचार आणि पत्रकवाटप यांसारख्या माध्यमांतून व्यापक जनजागृती करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

या प्रसंगी कॉ. एम. एच. शेख आणि कॉ. नसीमा शेख यांनी मेळाव्याला संबोधित केले. पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर) यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मंचावर ॲड. अनिल वासम आणि कॉ. शेवंताताई देशमुख उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाहनतळ येथील चार्जिंग स्टेशनला महापौर व पदाधिकाऱ्यांची भेट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि नागरिकांसाठी सुविधाजनक करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

शहरासाठी प्रस्तावित नवीन ई-बस सेवेसंदर्भात महापौर विनायक कोंड्याल यांनी आज डॉ बाबासाहेब आंबेडकर वाहन स्थळ चार्जिंग स्टेशन या ठिकाणी सदिच्छा भेट दिली पहाणी केली.

या वेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे,नगरसेवक गौतम कसबे, परिवहन व्यवस्थापक सारिका आकुलवार यांच्यासह संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

महापौर विनायक कोंड्याल यांच्यासह उपस्थित पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाहनतळ येथे भेट



देऊन ई-बससाठी उभारण्यात आलेल्या चार्जिंग स्टेशनला भेट दिली. यावेळी चार्जिंग स्टेशनची व्यवस्था, उपलब्ध सुविधा तसेच ई-बसच्या संचालनासाठी आवश्यक असलेल्या विद्युत व्यवस्थेबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली.

ई-बसच्या नियमित संचालनासाठी आवश्यक असलेल्या चार्जिंग तसेच देखभाल-दुरुस्तीच्या सुविधांची तयारी याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

ई-बस सेवा सुरू झाल्यानंतर नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सुविधा सक्षम करण्यावर भर देण्यात आला.

महापालिका परिवहन व्यवस्थेचे नियोजन अधिक प्रभावी करताना शहरातील नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाच्या गरजा लक्षात घेऊन ई-बसचे मार्ग व संचालनाचे नियोजन करण्यात येणार आहे.

नवीन ई-बस सेवा लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

# 'आशीवार्दाचा दिवा' उपक्रमातून महिला कर्मचाऱ्याच्या घरी दीपप्रज्वलन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'आशीवार्दाचा दिवा'या उपक्रमांतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, दक्षिण सोलापूर येथे शिपाई पदावर कार्यरत असलेल्या महिला कर्मचारी काजल कांबळे यांच्या निवासस्थानी भेट देऊन दीपप्रज्वलन करण्यात आले.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत मिळालेल्या लाभाच्या माध्यमातून काजल कांबळे यांना शासकीय सेवेत नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. त्यांच्या या यशस्वी वाटचालीची दखल घेत सेवा संकल्प अभियानांतर्गत त्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी त्यांच्या शासकीय सेवेत दाखल होण्याच्या प्रवासाची माहिती जाणून घेण्यात आली.

सोलापूर जिल्ह्यात जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन तसेच सेवा संकल्प अभियानाचे नोडल अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागप्रमुखांच्या समन्वयातून सेवा संकल्प अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत विविध विभागांच्या माध्यमातून लोकाभिमुख आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

याच अनुषंगाने समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांच्या नियंत्रणाखाली समाजकल्याण विभागामार्फत सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांच्या यशोगाथा समाजासमोर आणणे, योजनांविषयी जनजागृती करणे आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र व्यक्तींपर्यंत पोहोचविणे यावर विभागाकडून विशेष भर देण्यात येत आहे.

# महात्मा गांधीजींनी ग्रामोद्योगातून स्वावलंबी जीवनाचा संदेश दिला- मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** महात्मा गांधीजींनी स्वदेशी, ग्रामोद्योग, सुत कताईतून स्वावलंबी जीवन जगण्याचा संदेश दिला त्यामुळे श्रमाला प्रतिष्ठा मिळाली त्यांचे हेच विचार युवकांनी अंगीकारले पाहिजेत असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, पुनम कोकळगी, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.पुढे बोलताना ते म्हणाले की, आजचा युवक विघातक शक्तीच्या पाठीमागे धावत आहे, त्यामुळे त्याच्या जीवनाची



महात्मा गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी व मान्यवर

घडी बिघडत चालली आहे, त्याने गांधीजीनी सांगीतलेल्या मार्गाने वाटचाल करावी, त्यांचा स्वावलंबी जीवनाचा मंत्र स्वीकारून श्रमाला प्रतिष्ठा दिली तर जीवन सुखकर होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन सौरभ भस्मे यांनी केले आभार डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी मानले कार्यक्रमास प्राध्यापिका सौंदर्य शास्त्री, जनाबाई चौधरी, शीतल फुटाणे, ऐश्वर्या तारापुरे, शिवकुमार मठदेवरु, गुरुशांत हपाळे उपस्थित होते.

**साबरमतीला गेल्यामुळे जीवन कृतार्थ झाले**

गांधीजींचे जन्म ठिकाण पोरबंदर व साबरमती आश्रमात जाण्याचा योग आला तेथे गेल्यानंतर गांधीजींच्या भव्य कार्याचे दर्शन झाले अन आपले जीवन कृतार्थ झाले अशी भावना मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केली.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये स्वच्छता अभियान

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर अंतर्गत शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहांमध्ये स्वच्छ, सुंदर, निरोगी व सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.

दि. २ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत दि. ३ ऑक्टोबर रोजी प्रकल्प कार्यालय, तसेच अधिनस्त ३ शासकीय आश्रमशाळा, २ अनुदानित आश्रमशाळा व ६ शासकीय वसतिगृहांमध्ये स्वच्छता मोहीम




राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान कार्यालय, शाळा व वसतिगृह परिसरातील कचरा, दगड, अनावश्यक झुडपे व इतर अनावश्यक साहित्य हटविण्यात आले. तसेच प्रवेशद्वार, अंतर्गत रस्ते, प्रांगण व सभोवतालच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली.

विद्यार्थ्यांना स्वच्छ, निरोगी व सुरक्षित शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेबाबत जनजागृती आणि स्वच्छतेची सवय निर्माण करण्याच्या उद्देशाने अभियानातील विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

हे अभियान प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, प्रकल्प कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, आश्रमशाळा व वसतिगृहातील कर्मचारी आणि संबंधितांनी अभियानात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# सेवा संकल्प अभियानातून उत्तर सोलापूरच्या विकासकामांना गती- कुशल जैन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन (भा.प्र.से.) यांनी उत्तर सोलापूर तालुक्याचा पाहणी दौरा केला. या दौऱ्यात पंचायत समिती येथे संयुक्त आढावा बैठक घेण्यासह हिरज, शिवणी आणि तिऱ्हे येथे भेटी देऊन पाणीटंचाई, आरोग्य, शिक्षण, जलजीवन मिशन, घरकुल, पोषण, जलसंवर्धन आणि ग्रामविकासाच्या विविध कामांची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेण्यात आला.

'प्रशासन गावाच्या दारी आणि सेवा नागरिकांच्या हक्काचीह ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सेवा संकल्प अभियान प्रभावीपणे राबवावे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

पाणीटंचाईवर तातडीच्या उपाययोजना करण्याचे निर्देश

दौऱ्याच्या प्रारंभी पंचायत समिती उत्तर सोलापूर येथे तालुक्यातील पाणीटंचाईच्या परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. उपलब्ध



पाणीस्रोत, संभाव्य टंचाईग्रस्त भाग तसेच पाणीटंचाई निवारणासाठी करावयाच्या अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली. त्यानंतर तालुक्यातील सर्व विभागांचे खातेप्रमुख आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक घेण्यात आली. पाणीटंचाईच्या प्रश्नावर तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी निर्माण होणार नाहीत याची दक्षता घ्यावी आणि सुरू असलेल्या विकासकामांना गती द्यावी, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिल्या.

यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आवास योजनांच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनांचा लाभ मिळवून देण्याबरोबरच प्रलंबित घरकुलांची कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

हिरज येथे पोषण माह, आरोग्य शिबिर व विविध उपक्रमांची पाहणी

सेवा संकल्प अभियानांतर्गत हिरज ग्रामपंचायतीला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यात आल्या. ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची पाहणी करून मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले.

हिरज येथे राष्ट्रीय पोषण माह अभियानांतर्गत आयोजित उपक्रम तसेच महिला आरोग्य तपासणी शिबिराची पाहणी करण्यात आली. अंगणवाडीतील लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. तसेच जलसंवर्धन, वृक्षलागवड आणि पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांची पाहणी करण्यात आली.

गावात पूर्ण झालेल्या घरकुलांचा गृहप्रवेश सोहळा मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या हस्ते पार पडला. सेवा संकल्प अभियानांतर्गत नागरिकांना जन्म, मृत्यू व विवाह नोंदणीचे दाखले वितरित करण्यात आले. शासकीय सेवा नागरिकांपर्यंत थेट पोहोचविण्याच्या अभियानाच्या उद्देशाला यामुळे चालना मिळाली.

यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करून त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिरज येथे भेट देऊन शाळेतील पायाभूत सुविधा, शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची पाहणी करण्यात आली.

शिवणी येथे जलजीवन मिशनच्या कामाची पाहणी

शिवणी ग्रामपंचायतीला भेट देऊन जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. योजनेची सद्यस्थिती, कामाची प्रगती, पाणीपुरवठ्याची उपलब्धता आणि नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतली.

तिऱ्हे प्राथमिक आरोग्य केंद्रातील अडचणींची दखल

तिऱ्हे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यात आला. अपुऱ्या जागेमुळे आरोग्य सेवा पुरविताना निर्माण होणाऱ्या अडचणींची माहिती घेण्यात आली. आरोग्य केंद्रातील सुविधांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी-कर्मचाऱ्यांशी संवाद

या दौऱ्यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. सेवा संकल्प अभियान तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून नागरिकाभिमुख प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उत्तर सोलापूरचे गटविकास अधिकारी राजाराम भोंग, सहाय्यक गटविकास अधिकारी बाबासाहेब पाटील, विस्तार अधिकारी (पंचायत) सोमनाथ शिंदे यांच्यासह विविध विभागांचे खातेप्रमुख, अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देणे हीच नानांना खरी श्रद्धांजली : अक्षय भांड

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती स्व. चंद्रशेखर (नाना) भांड यांच्या स्मृतीदिनानिमित्त अक्षय दादा भांड मित्र परिवाराच्या वतीने नातेपुते शहरात दोन दिवसीय व्यापक स्वच्छता व जंतुनाशक फवारणी मोहीम राबविण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक तसेच धनगर गल्ली परिसरातील प्रभाग क्रमांक १५ व १६ मध्ये स्वच्छता करण्यात आली. त्याचबरोबर परिसरात जंतुनाशक फवारणी करून नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष काळजी घेण्यात आली.

यावेळी अक्षय भांड म्हणाले, 'स्व. चंद्रशेखर नाना भांड यांनी समाजसेवा, लोककल्याण आणि शहराच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले. त्यांच्या सेवाभावी विचारांचा वारसा पुढे नेत नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि शहर स्वच्छ व निरोगी



ठेवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली आहे.'

या उपक्रमाला नागरिक व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती मणून नवनाथ ठोंबरे, डॉ. नरेंद्र कवितके, डॉ. संदिप महामुनी, नंदकिशोर धालपे, गणेश कुचेकर, मयूर पाडसे, सुरज चांगण, दादा लाळगे, शंकर डफळ, चंद्रकांत तात्या ठोंबरे, सुनिल ढोबरे, अशोक राऊत, प्रशांत ठोंबरे, पिंटू भगत महाराज, दिलीप लाळगे, ढवळे सर, वैभव शहा, किरण कुलकर्णी, नितीन बडवे, विनायक उराडे, संजय मामा उराडे, अकबर शेख, शेखर पिसे, गणेश राऊत, डॉ. विशाल दोशी, संदिप दळवी, लखन दळवी, सुनिल ढोबळे, भागवत काळे, अर्जुन पिसाळ, बाळू भांड, वैभव लाळगे, संदिप चांगण, किशोर दगडे, दिलीप सावळकर, धनराज डफळ, रियाज शेख, दादा अटक, प्रथमेश पांढरे, विशाल भरते, किरण काटकर तसेच अक्षय दादा भांड मित्र परिवारातील कार्यकर्ते उपस्थित होते.